# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६

## विद्युत अधिनियम, २००३

**प्रास्ताविक**

क्र एमईआरसी/एडीएम/१६८/२००६/२३३३ विद्युत अधिनियम, २००३ ( २००३ चा अधिनियम ३६) खाली महाराष्ट्र राज्यात परवाने देण्याचे अधिकार आयोगाला प्रदान करण्यात आले असल्यामुळे, विशेषतः खालील बाबींसंबंधी म्हणजे- (अ) कलम (१४) च्या पहिल्या परंतुकाखाली विनिर्दिष्ट करावयाचा कालावधी; (ब) कलम (१५) च्या उप-कलम (१) खालील अर्जाचा नमूना व पध्दत; (क) कलम (१५) च्या उप-कलम (२) खाली प्रसिध्द करावयाची परवान्यासाठीच्या अर्जाची पध्दत व तपशील; (ड) कलम (१६) खालील परवान्याच्या अटी; (इ) कलम (१८) च्या उप-कलम (२) च्या खंड (ए) खालील नोटीसची पध्दत व तपशील; आणि (फ) कलम (१८) च्या उप-कलम (२) च्या खंड (सी) खाली परवान्यात करावयाचे बदल व सुधारणा यांच्या प्रसिध्दीबाबत, तरतूद करण्यासाठी विनियम करावे लागतात.

दिनांक १० जून, २००३ रोजी अधिनियम अंमलात आल्यानंतर, आयोगाने, कलम १८१ खालील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, २००४ दिनांक १० जून, २००४ रोजीच्या शासकीय राजपत्रात, पूर्व-प्रसिध्दी देऊन, अधिसूचित केले.

परवानेधारक किंवा परवानेधारकांच्या वर्गासाठी आणि अधिनियमाच्या कलम १४ च्या पहिल्या, दुस-या, तिस-या आणि पाचव्या परंतुकामध्ये उल्लेखलेल्या परवानेधारकांकरिता सर्वसाधारण आणि/किंवा विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करण्याची सांविधिक जबाबदारी, अधिनियमाच्या कलम १६ खाली, आयोगावर आहे. सध्या अस्तित्वात असलेले आणि भविष्यातील परवानेधारक या दोघांनाही लागू होणा-या सर्वसाधारण अटींच्या प्रारुपावर, पूर्व-प्रसिध्द करण्याच्या कार्यपध्दतीचे पालन केल्यानंतर राज्यातील सध्या अस्तित्वात असलेले वितरण परवानेधारक, आणि ग्राहक प्रतिनिधी व इतर हितसंबंधित यांच्याकडून, अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर, सुनावणी घेऊन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, २००४ अधिक्रमित करुन आयोग, खालील विनियम करीत आहेः

क्र. मविनिआ/लिगल३/सुधारित वितरण परवाना विनियम/२००६/२३३३ विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम १८१ च्या उप-कलम (२) खंड (बी) सह कलम १५चे उप-कलम (१), कलम १८१ च्या उप-कलम (२) खंड (सी) सह कलम १५चे उप-कलम (२), कलम १८१ च्या उप-कलम (२) खंड (डी) सह कलम १६, कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (इ) सह कलम १८ चे उप-कलम (२) खंड (ए), कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (एफ) सह कलम १८ चे उप-कलम (२) खंड (सी), कलम १८१च्या उप-कलम (२) चा खंड (झेडएम) सह कलम १२८चे उप-कलम (८) आणि कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (झेडपी) अन्वये

प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालील प्रमाणे विनियम करीत आहे-

१. **संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ**

(१) या विनियमांना "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६" असे म्हणावे.

(२) हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यास लागू राहतील.

(३) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. (१) **व्याख्या:** संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर, या विनियमांमध्ये:

**"लेखा विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता परवानाप्राप्त व्यवसायासाठी तयार केलेली लेखा विवरणपत्रे ज्यात, (एक) कंपनी अधिनियम, १९५६च्या अनुसूची ६ च्या भाग १ मधील नमुन्याप्रमाणे तयार केलेला ताळेबंद; (दोन) कंपनी अधिनियम, १९५६च्या अनुसूची ६ च्या भाग २ मधील आवश्यक बाबींची पूर्तता करणारे नफा-तोटा पत्रक; (तीन) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या रोकड प्रवाह विवरणपत्राबाबतच्या लेखा मानक (एएस-३) प्रमाणे तयार केलेले रोकड प्रवाह विवरणपत्र; (चार) वितरण परवानाधारकाच्या सांविधिक लेखा परीक्षकाचा अहवाल; (पाच) केंद्र सरकारने कंपनी अधिनियम, १९५६च्या कलम २०९(१)(डी) खाली विहित केलेले परिव्यय अभिलेखे व त्यासोबत असलेल्या टिपण्या आणि निधीच्या जमा व खर्चाचे विवरणपत्र, आणि आयोग वेळोवेळी निदेश देईल अशी पुष्टी देणारी विवरणपत्रे व माहिती यांचा समावेश असेल.

परंतु असे की, कोणतेही स्थानिक प्राधिकरण जर विजेच्या वितरणाचा व्यवसाय करीत असेल तर, लेखा विवरणपत्रे म्हणजे, अशा स्थानिक प्राधिकरणांना लागू असलेल्या संबधित अधिनियम किंवा कायद्यानुसार तयार केलेल्या व ठेवलेल्या वर उल्लेखलेल्या बाबी असतील.

**"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३चा ३६);

**"वार्षिक लेखे"** म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार आणि/किंवा आयोग वेळोवेळी निदेश देईल त्यानुसार अन्य पध्दतीने तयार करण्यात आलेले वितरण परवानाधारकाचे लेखे;

**" वितरणाचे क्षेत्र " किंवा "पुरवठ्याचे क्षेत्र"** म्हणजे वितरण परवान्यात उल्लेखलेले क्षेत्र ज्यामध्ये, त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी, वितरण यंत्रणा चालू ठेवण्यास व सुव्यवस्थित राखण्यास वितरण परवानाधारक प्राधिकृत असेल.

**"लेखापरीक्षक"** म्हणजे कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) च्या कलम २२४ ते २३४ए किंवा कलम ६१९ च्या तरतुदींनुसार, जसे असेल तसे, पद धारण करणारे वितरण परवानाधारकाचे लेखापरीक्षक किंवा जर वितरण परवानाधारक मर्यादित कंपनी नसेल तर लेखापरीक्षक आयोगाच्या निदेशानुसार असेल;

**"प्राधिकृत"** म्हणजे कोणतीही व्यक्ती, व्यवसाय किंवा कार्यांच्या संबंधात, अधिनियमाच्या कलम १४ नुसार दिलेला परवाना किंवा अधिनियमाच्या कलम १४ च्या पहिल्या, दुस-या, तिस-या, आणि पाचव्या परंतुकाखाली देण्यात आला आहे असे मानण्यात आलेला परवाना किंवा अधिनियमाच्या कलम १३ आणि आयोगाच्या विनियमांखाली जी सूट देण्यात आलेली आहे त्याअन्वये, प्राधिकृत;

**"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

**"मानीव परवानाधारक"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १४ च्या पहिल्या, दुस-या, तिस-या, आणि पाचव्या परंतुकाखाली, त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणा चालू ठेवण्यास व सुव्यवस्थित राखण्यास, प्राधिकृत असलेली व्यक्ती;

**"वितरण"** म्हणजे वितरण यंत्रणेच्या द्वारे विजेचे वहन किंवा वीज वाहून नेणे;

**"वितरण व्यवसाय"** म्हणजे वितरण परवानाधारकाचा पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण यंत्रणा चालविण्याचा आणि ती सुव्यवस्थित राखण्याचा प्राधिकृत व्यवसाय;

**"वितरण परवानाधारक"** म्हणजे वितरण परवान्याद्वारे त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण यंत्रणा चालविण्यासाठी आणि ती सुव्यवस्थित राखण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती आणि त्यामध्ये विद्युत अधिनियमाच्या कलम १४ खाली अशा प्राधिकृत करण्यात आलेल्या मानीव परवानाधारकाचा समावेश असेल;

**"सर्वसाधारण अटी"** म्हणजे या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी;

**"परवानाप्राप्त व्यवसाय"** म्हणजे वितरण परवान्याखाली प्राधिकृत करण्यात आल्याप्रमाणे विजेच्या वितरणाचा आणि पुरवठ्याचा व्यवसाय;

**"महत्वाचा बिघाड"** म्हणजे विजेच्या वितरणाशी संबंधित घटना, जिच्यामुळे विद्युत सेवेत मोठा बिघाड, साधनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान, किंवा जीवित-हानि अथवा माणसांना गंभीर इजा होते, किंवा अन्यथा आयोगाने विनिर्दिष्ट केलेली घटना आणि त्यामध्ये महत्वाचा बिघाड म्हणून आयोग घोषित करेल अशा कोणत्याही अन्य घटनेचा समावेश असेल;

**"संचालनविषयक नियंत्रण"** म्हणजे सेवा-वाहिन्या व उपकरणे कार्यान्वित आणि वापर करणे यासारखे संचालनविषयक निर्णय घेण्याचे अधिकार असणे;

**"अन्य व्यवसाय"** म्हणजे मत्तांचा सर्वात जास्त योग्य वापर व्हावा या हेतूने वितरण परवानाधारकाने आयोगाला पूर्व-सूचना देऊन परवानाप्राप्त व्यवसायाशिवाय हाती घेतलेला अन्य व्यवसाय;

**"कृतीची मानके "** म्हणजे अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेल्या विनियमानुसार आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेली वितरण परवानाधारकाच्या कृतीची मानके;

**"विनियम"** म्हणजे अधिनियमातील तरतुदींखाली आयोगाने केलेले विनियम;

**"विशिष्ट अटी"** म्हणजे सर्वसाधारण अटीं व्यतिरिक्त आणि त्या अटींशी सुयोग्य, एखाद्या वितरण परवानाधारक किंवा परवानेधारकांच्या वर्गाकरिता, आयोग निश्चितपणे घालून देईल अशा अटी;

**"राज्य"** म्हणजे महाराष्ट्र राज्य;

**"राज्य शासन "** म्हणजे महाराष्ट्र राज्याचे शासन;

**"राज्य ग्रिड संहिता"** म्हणजे आयोगाने विनिर्दिष्ट केलेली ग्रिड संहिता ज्यामध्ये ग्रिडशी जोडणी व ग्रिडच्या संचालनाशी संबधित सर्व महत्वाच्या तांत्रिक बाबींचा, आणि वितरण यंत्रणेचा वापर, किंवा (वितरण यंत्रणेच्या संचालनाशी आणि वापराशी जेवढे संबधित असेल तेवढे) वितरण यंत्रणेशी, अनेक वितरण यंत्रणांशी, किंवा कोणत्याही पुरवठादाराच्या यंत्रणेशी जोडलेल्या विद्युत वाहिन्या व विद्युत संयंत्राचे संचालन, यांचा समावेश असेल;

**"हस्तांतरण"** म्हणजे कोणतेही कंत्राट, हमीपत्र किंवा करार किंवा त्यांचा कोणताही भाग यांच्यामधील तरतूदींनुसार लागू केलेले किंवा निर्माण झालेले कोणतेही हक्क, भार किंवा बोजा किंवा तारणविषयक हितसंबंध, किंवा कोणताही बोजा देणे, किंवा अन्यथा कोणताही बोजा निर्माण करण्यास, किंवा मत्तेचा प्रत्यक्ष ताबा सोडण्यास किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या देवाणघेवाणीस परवानगी देणे,

**"उपयोगकर्ता"** म्हणजे वितरण यंत्रणेचा वापर करणारी कोणतीही व्यक्ती.

(२) **अर्थनिश्चिती**

(अ) या विनियमात वापरलेल्या आणि ज्यांची व्याख्या करण्यात आलेली नाही, अशा शब्द आणि उक्तींना अधिनियमात असलेला अर्थ राहील.

(ब) संदर्भ म्हणजे त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या कोणत्याही कायदा, नियम आणि विनियमांना केलेला संदर्भ असेल.

## ३. हे विनियम कोणास लागू असतील

हे विनियम राज्यातील सर्व वितरण परवानेधारकांना आणि या विनियमांच्या प्रसिध्दीच्या दिनांकाच्या दिवशी आयोगाकडे प्रलंबित असलेल्या अर्जासह वितरण परवान्यासाठीच्या सर्व अर्जांना लागू असतील.

## ४ पात्रतेच्या अटी /अपात्रता

या विनियमाखाली परवाना देण्याकरिता पात्रतेच्या अटी/अपात्रता आयोग विनिर्दिष्ट करु शकेल. वर नमूद केलेल्या बाबींतील सर्वसाधारणता काहीही असली तरी, अधिनियमाखालील कर्तव्ये आणि बंधनांचे पालन करण्यासंबंधात सध्याची स्थिती किंवा परिस्थिती अर्जदाराच्या क्षमतेबाबत आयोगाच्या मते शंका निर्माण करणारी असेल तर, कोणताही अर्जदार या विनियमांखाली परवान्यासाठी पात्र ठरणार नाही.

स्पष्टीकरणः- या विनियमाच्या प्रयोजनार्थ "स्थिती किंवा परिस्थिती " म्हणजे व त्यामध्ये, अर्जदार किंवा त्याचा कोणताही भागीदार, संचालक किंवा प्रवर्तकाविरुध्द न्यायालयामध्ये गुन्हा शाबित झालेली प्रकरणे, किंवा समाजाच्या/जमातीच्या नैतिक श्रध्देला धक्का लागल्यामुळे संताप निर्माण करणारा एखादा गंभीर स्वरुपाचा अपराध; अर्जदार किंवा त्याच्या कोणत्याही भागीदार, संचालक किंवा प्रवर्तकाची नादारी किंवा दिवाळखोरी; प्रलंबित न्यायालयीन खटले; नैतिक अधःपतन अंतर्भूत असलेला गुन्हा शाबित होणे, किंवा कोणताही आर्थिक गुन्हा; लबाडीच्या आणि अनुचित व्यापार प्रथा किंवा बाजारातील हातचलाखी; आर्थिक सचोटी; सक्षमता; लौकिक आणि चारित्र्य आणि अन्य कोणत्याही पुरेशा कारणामुळे ठपका ठेवण्यात आलेल्या / नियामक प्राधिकरणाने दिलेल्या प्रतिकूल आदेशाची प्रकरणे, यांचाही समावेश असेल.

परंतु असे की, आयोगाच्या कार्यालयात आणि/किंवा त्याच्या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या नमुन्यात, आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेली कागदपत्रे आणि माहितीसह हमीपत्र, अर्जदाराला त्याच्या अर्जासोबत पाठविण्यास आयोग सांगू शकेल.

परंतु आणखी असे की, अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय परवाना मिळविण्याचा कोणताही अर्ज नाकारण्यात येणार नाही.

## ५. परवाना देण्याची कार्यपध्दती

### ५.१ परवाना देण्याकरिता करावयाचा अर्ज

५.१.१ परवाना देण्याकरिता नमुन्यात अर्ज करण्यात येईल आणि आयोग वेळोवेळी ठरवेल ते दस्तऐवज व माहिती त्यासोबत जोडण्यात येईल आणि तो नमुना आयोगाच्या कार्यालयात आणि/किंवा इंटरनेटवरील त्याच्या वेबसाईटवर उपलब्ध राहील.

५.१.२ विनियम ५.१.१ खाली अर्ज करताना अर्जासोबत अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (१) खाली विहीत करण्यात येईल त्याप्रमाणे शुल्क, अर्जदार भरेल.

५.१.३ विनियम ५.१.१ खालील अर्जावर अर्जदार सही करेल व तो सचिवांना संबोधित करण्यात येईल आणि आयोगाच्या वेळोवेळी अंमलात असणा-या कामकाज प्रचालनाच्या विनियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे याचिका दाखल करण्यात येतात, त्याच पध्दतीने अर्ज सादर करण्यात येईल.

## ५.२ अर्जाची छाननी

५.२.१ आयोग अथवा सचिव किंवा आयोगाने या कामासाठी पदनिर्देशित केलेला कोणताही अधिकारी, अर्जाची छाननी झाल्यानंतर अर्जाचा विचार करण्यासाठी आवश्यक वाटणारी व जितकी व्यवहार्य असेल तितकी अधिक माहिती किंवा तपशील किंवा दस्तऐवज पाठविण्यास अर्जदाराला, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) कामाच्या दिवसांच्या कालावधीत, कळवू शकेल.

५.२.२ अर्ज पूर्ण असल्याची व त्याबरोबर आवश्यक ती सर्व माहिती, तपशील व दस्तऐवज जोडले असल्याची आणि आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली असल्याची खात्री झाल्यावर, आयोग, सचिव किंवा आयोगाने या कामासाठी पदनिर्देशित केलेला अधिकारी, परवाना देण्याकरिता अधिनियम व या विनियमातील कार्यपध्दतीनुसार, अर्जाची नोटीस प्रसिध्द करण्याची प्रक्रिया सुरु करण्यास अर्जदारास कळवेल.

## ५.३ परवाना देण्याकरिता अर्जाची नोटीस

५.३.१ विनियम ५.२.२ मधील तरतूदीनुसार, कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसांच्या आत, अर्जदार, परवाना देण्याकरिता अर्जाची नोटीस, वीज पुरवठ्याच्या प्रस्तावित क्षेत्रामधील मोठ्या प्रमाणावर खप असणा-या इंग्रजी भाषेतील कमीत कमी दोन (२) दैनिक वर्तमानत्रात आणि मराठी भाषेतील कमीत कमी दोन (२) दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करेल.

५.३.२ विनियम ५.३.१ मध्ये उल्लेखलेल्या अर्जाच्या नोटीसमध्ये खालील बाबींचा समावेश असेल-

(अ) अर्जदाराचे नाव आणि नोंदणीकृत कार्यालय आणि/किंवा व्यवसायाच्या मुख्य जागेचा पत्ता;

(ब) मागितलेल्या परवान्याचे स्वरुप आणि अर्जाची इतर ठळक वैशिष्ट्ये;

(क) अर्जदाराचा कायदेशीर दर्जा, शेअर-होल्डिंग पॅटर्न (कंपनीच्या बाबतीत), व्यवस्थापनाबाबतची माहिती, कार्याचा गोषवारा व अशाच प्रकारच्या कार्यातील पूर्वानुभव.

(ड) पुरवठ्याचे प्रस्तावित क्षेत्र आणि सेवा द्यावयाच्या ग्राहकांची प्रस्तावित संख्या;

(इ) परवान्याच्या अर्जाची व त्यात उल्लेखलेल्या दस्तऐवजांची फोटोकॉपी (व्यक्तीशः अथवा पोस्टाने) तपासणीसाठी मिळू शकेल किंवा फोटोकॉपी काढण्यासाठी येणा-या खर्चाइतक्या किंमतीस ज्याच्याकडून विकत घेता येईल, अशा व्यक्ती/व्यक्तींचा संपर्काचा पत्ता. जर अर्जदाराकडे इंटररनेट वेबसाइट असेल तर परवान्यासाठीचा अर्ज व त्यात उल्लेखलेली दस्तऐवजे विनामूल्य उतरवून घेण्यासाठी त्या वेबसाईटचा तपशीलदेखील उपलब्ध करुन द्यावा लागेल.

(फ) अधिनियमाच्या कलम १४ च्या सहाव्या परंतुकाखाली येणा-या प्रकरणातील परवान्यासंबंधात या परंतुकाखाली केंद्र सरकारने विहीत केलेल्या आवश्यक बाबींची पूर्तता केली असल्याबाबत पुष्टी देणारे एक निवेदन इतर आवश्यक तपशीलांसह अर्जदार सादर करेल; आणि

(ग) परवाना देण्याकरिता करावयाच्या अर्जाच्या संदर्भात, कोणताही आक्षेप असणारी कोणतीही व्यक्ती, नोटीसच्या वरीलप्रमाणे प्रसिध्दीच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसात, असा आक्षेप लेखी निवेदनाद्वारे (सहा प्रतीत), सचिवांना संबोधित करुन आयोगास सादर करु शकेल, असे एक निवेदन ५.३.१ मध्ये उल्लेखलेल्या अर्जाच्या नोटीसमध्ये असेल.

परंतु असे की, परवान्याकरिता अर्ज प्राप्त झाल्यापासून दहा (१०) कामाच्या दिवसात, आयोग, त्यास उचित आणि व्यवहार्य वाटेल अशा अधिक तपशीलाचा समावेश या नोटीसमध्ये करण्यास, अर्जदाराला कळवू शकेल.

परंतु असे की, विनियम ५.१ ते ५.३ मधील काहीही मानीव परवानाधारकांना, लागू राहणार नाही.

## ५.४ परवान्याची तपासणी व त्याच्या प्रती पुरवण्याबाबत

५.४.१ ज्या व्यक्तीला वितरण परवाना देण्यात आला आहे अशी व्यक्ती, त्याला परवाना मिळाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत अशा परवान्याच्या प्रती, त्याचे पुरवठ्याचे क्षेत्र दाखविणारा नकाशा किंवा नकाशे यांच्यासह, त्यांची फोटोकॉपी काढण्यासाठी व विक्रीसाठी (छापील प्रती) येणा-या खर्चाइतक्या किंमतीला, पुरवठ्याच्या क्षेत्रात असलेल्या त्याच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन कामाच्या वेळेमध्ये, जनतेच्या तपासणीसाठी उपलब्ध करुन देईल.

परंतु असे की, माहितीची मागणी करणा-या अर्जदारास, माहिती हवी असण्याचे कारण किंवा अन्य कोणताही वैयक्तिक तपशील द्यावा लागणार नाही; फक्त त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी आवश्यक असणारा तपशील त्यास द्यावा लागेल.

## ६ परवान्याची दुरुस्ती

६.१ जेथे वितरण परवानाधारकाने, अधिनियमाच्या कलम १८ च्या उप-कलम (१) खाली, त्याच्या परवान्यात बदल किंवा अल्प-बदल प्रस्तावित करणारा अर्ज केला असेल, तेथे वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील, मोठ्या प्रमाणावर खप असण-या इंग्रजी भाषेतील कमीत कमी दोन (२) दैनिक वर्तमानापत्रात आणि मराठी भाषेतील कमीत कमी दोन (२) दैनिक वर्तमानापत्रात अशा अर्जाबाबत एक नोटीस प्रसिध्द करेल.

६.२ वर नमूद केलेली नोटीस, बदल किंवा अल्प-बदल करणारा अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सात (७) दिवसांच्या मुदतीत, प्रसिध्द करण्यात येईल व त्यात खालील तपशील असेल-

(अ) वितरण परवानाधारकाचे नांव व त्याच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि/किंवा व्यवसायाच्या मुख्य जागेचा पत्ता;

(ब) परवान्यात जे बदल किंवा अल्प-बदल करण्याकरिता आयोगाकडे अर्ज करण्यात आला आहे त्यांचा तपशील व त्यासोबत असा बदल किंवा अल्प-बदल करण्याची कारणमिमांसा व समर्थन;

(क) त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असणा-या व्यक्तींच्या तपशीलाचा गोषवारा;

(ड) बदल किंवा अल्प-बदल करण्याकरिता केलेला अर्ज आणि त्यात उल्लेखलेले इतर दस्तऐवज (व्यक्तीशः अथवा पोस्टाने) तपासणीसाठी मिळू शकतील किंवा फोटोकॉपी काढण्यासाठी येणा-या खर्चाइतक्या किंमतीस ज्याच्याकडून विकत घेता येतील, अशा व्यक्ती/व्यक्तींचा संपर्कासाठीचा पत्ता. जर अर्जदाराकडे इंटररनेट वेबसाईट असेल तर बदल किंवा अल्प-बदल करण्याकरिता केलेला अर्ज आणि इतर दस्तऐवज विनामूल्य उतरवून घेण्यासाठी त्या वेबसाईटचा तपशील;

(इ) वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या अर्जाच्या संदर्भात कोणताही आक्षेप असणारी कोणतीही व्यक्ती, नोटीसच्या वरीलप्रमाणे प्रसिध्दीच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसात, असा आक्षेप लेखी निवेदनाद्वारे (सहा प्रतीत) सचिवास संबोधित करुन, आयोगास सादर करु शकेल, असे एक निवेदन, बदल किंवा अल्प-बदल करावयाच्या अर्जाच्या नोटीसमध्ये, असेल.

परंतु असे की, आयोग, त्यास उचित वाटेल अशा अधिक तपशीलाचा समावेश या नोटिसमध्ये करण्यास अर्जदाराला, कळवू शकेल.

६.३ जेथे परवानाधारकाचा अर्ज नसताना परवान्यामध्ये बदल किंवा अल्प-बदल करावयाच्या असतील तेथे, प्रस्तावित बदल किंवा अल्प-बदल खालील तपशीलासह आयोग प्रसिध्द करेल-

(अ) वितरण परवानाधारकाचे नांव व त्याच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि/किंवा व्यवसायाच्या मुख्य जागेचा पत्ता;

(ब) बदल किंवा अल्प-बदलांचा तपशील व त्यासोबत परवान्यात असे बदल किंवा अल्प-बदल करण्याची कारणमिमांसा व समर्थन;

(क) त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींच्या तपशीलाचा गोषवारा;

६.४ विनियम ६.३ मध्ये उल्लेखिलेल्या बदल किंवा अल्प-बदलांबाबत कोणताही आक्षेप असणारी कोणतीही व्यक्ती, वरील प्रसिध्दीच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आत, असे आक्षेप सचिवास संबोधित करुन, लेखी निवेदनाद्वारे (सहा प्रतीत) आयोगाला सादर करेल.

## ७. अर्जावरील कार्यवाही

आयोगाच्या कामकाज प्रचालनासंबंधात कार्यपध्दती घालून देणा-या विनियमांद्वारे विनियम ५ आणि ६ खालील अर्जावरील कार्यवाहीच्या कामकाजाचे नियमन करण्यात येईल.

## ८ वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी

### ८.१ मुदत

विशिष्ट अटींमध्ये अन्यथा विहीत केले नसल्यास, अधिनियमाच्या कलम १५ (८) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वितरण परवान्याची मुदत असेल.

### ८.२ कायदे, नियम व विनियमांचे पालन

८.२.१ अधिनियम, नियम, व विनियमातील तरतुदींचे आणि आयोगाने वेळोवेळी पारित केलेले आदेश व निदेश आणि लागू असलेल्या अन्य सर्व कायद्यांतील तरतुदींचे पालन वितरण परवानाधारक करेल.

८.२.२ अधिनियमाखालील केंद्र व राज्य पारेषण कंपन्या, राष्ट्रीय भार प्रेषण केंद्र, प्रादेशिक भार प्रेषण केंद्र आणि राज्य भार प्रेषण केंद्र, केंद्रीय विद्युत प्राधिकरण आणि अन्य सांविधिक प्राधिकरणांच्या विनियम, आदेश व निदेशांचे उचित पालन वितरण परवानाधारक करेल.

८.२.३ आयोगाने मान्यता दिलेल्या नेटवर्क रोल-आऊट प्लॅनचे वितरण परवानाधारक पालन करेल.

### ८.३ वितरण परवानाधारकाची कार्ये/कामकाज

८.३.१ वितरण परवानाधारक त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात एक कार्यक्षम, विश्वसनीय, समन्वित आणि किमान खर्चाची वितरण यंत्रणा विकसित करेल व सुव्यवस्थित ठेवेल आणि अधिनियम, नियम, विनियमांमधील तरतुदीनुसार आणि आयोगाच्या आदेश व निदेशांनुसार अशा क्षेत्रातील ग्राहकांना खात्रीच्या विजेचा सुरक्षित पुरवठा करेल.

८.३.२ वितरण परवानाधारक त्याच्या वितरण यंत्रणेशी जोडलेल्या सर्व ग्राहकांना, कृतीच्या मानकांच्या विनियमांमधील तरतुदीनुसार आणि अधिनियम व त्याखाली पारित करण्यात आलेल्या नियम आणि विनियमांखाली आयोगाने पारित केलेल्या अन्य मार्गदर्शक सूचनांनुसार, विजेचा पुरवठा मिळेल याची खात्री देणारी आवश्यक ती सर्व उपाय-योजना तो करेल आणि पुरवठ्याच्या क्षेत्रातील कोणत्याही जागेच्या मालकाने किंवा ताबेदाराने अर्ज केल्यावर, अशा जागेला विद्युत पुरवठा करण्यासाठी, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी जोडणी देईल.

परंतु असे की, अधिनियमांतर्गत असलेली वितरण परवानाधारकाची कर्तव्ये पार पाडण्याकरिता, आयोग वेळोवेळी विनिर्दिष्ट करेल अशा मानकांचे यथोचित पालन वितरण परवानाधारक करेल.

८.३.३ अधिनियमातील तरतुदींखालील आणि परवान्याखालील बंधनांचे पालन करण्यासाठी आणि पुरवठ्याच्या क्षेत्रात विजेचे वितरण आणि पुरवठा करण्यासाठी आयोगाची पूर्व-मान्यता घेतल्यानंतर, वीज निर्मिती कंपन्यांकडून किंवा परवानेधारकांकडून किंवा अन्य स्रोतांकडून वीज खरेदीसाठी केलेल्या करारांद्वारे वितरण परवानाधारक विजेची खरेदी करेल. परंतु असे की, अशी खरेदी, आयोगाने वेळोवेळी केलेल्या विनियम, मार्गदर्शक सूचना आणि निदेशांना अनुसरुन असलेल्या काटकसरीच्या पध्दतीने व पारदर्शक अशा वीज खरेदी आणि प्राप्तीच्या प्रक्रियेनुसार असेल.

८.३.४ वितरण परवानाधारक, त्याच्या परवान्यातील अटींनुसार, विजेची विक्री किंवा पुरवठा करेल आणि अधिनियम व त्याखाली करण्यात आलेल्या नियम व विनियमातील तरतुदी व आयोगाने वेळावेळी पारित केलेल्या आदेशांना अनुसरुन विजेचे दर, आकार आणि शुल्क यांची वसूली करण्याचा आणि तसेच विजेचा पुरवठा करण्यासाठी किंवा सेवा पुरविण्यासाठी सुरक्षा अनामत जमा करण्यास सांगण्याचा त्याला हक्क राहील.

८.३.५ वितरण परवानाधारक, कोणत्याही परवानेधारकाला, स्व-वापरासाठीचे वीज निर्मिती प्रकल्प किंवा ग्राहकांसह विद्युत निर्मिती कंपन्यांना, वितरण यंत्रणेचा (विजेचे वहन करण्यासाठी) वापर करण्यासाठी, आयोगाने या प्रयोजनासाठी केलेल्या विनियमांना अनुसरुन, भेदभाव न करता मुक्त प्रवेश देईल.

८.३.६ वितरण परावानाधारक त्याच्या वितरण यंत्रणेतील शिल्लक उपलब्ध क्षमतेइतकी मधली वितरण सुविधा, आयोगाने या संदर्भात केलेल्या विनियमांना अनुसरुन किंवा आयोग आदेश देईल त्याप्रमाणे, अन्य पुरवठादारांना पुरवेल आणि शिल्लक उपलब्ध क्षमतेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास त्यावर आयोग निर्णय देईल. मधल्या वितरण सुविधेच्या वापरासाठी आकार 'आणि अटी व शर्ती, आयोगाने यासाठी दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या अधीन राहून, उभय परवानेधारकांनी मान्य केलेल्या असतील.

परंतु असे की, परवानेधारकाकडे किती शिल्लक क्षमता उपलब्ध आहे याबाबत जर काही वाद किंवा मतभेद उद्‌भवला तर त्या बाबतीत आयोग अभिनिर्णय देईल.

८.३.७ वितरण परवानाधारकाला खालील हक्क राहतील:-

(अ) विद्युत अधिनियम आणि त्याखाली केलेल्या नियम आणि विनियमातील तरतुदीनुसार किंवा पारित केलेल्या आदेशानुसार, त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील एखाद्या विशिष्ट क्षेत्रात विजेचे वितरण आणि/किंवा पुरवठा करण्यासाठी फ्रॅन्चायसीजची नियुक्ति करणे;

परंतु असे की, अशा नियुक्त केलेल्या फ्रॅन्चायसीबाबत, आयोगास उचित वाटेल अशा नमुन्यात आणि पध्दतीने, माहिती देणे वितरण परवानाधारकाचे कर्तव्य राहील.

(ब) विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना न घेता, पुरवठ्याच्या क्षेत्रात विजेचा व्यापार करणे;

परंतु असे की, वितरण परवानाधारक, त्याच्या पुरवठा क्षेत्रात वीज पुरवठा करण्याचे त्याचे कर्तव्य पार पाडण्याकरिता जी वीज किंवा उर्जा क्षमता आवश्यक नसेल त्या वीज किंवा उर्जा क्षमतेची, आयोगाच्या पूर्व-मान्यतेने, करारांतर्गत कालावधीकरिता, राज्यांतर्गत परंतु पुरवठा क्षेत्राच्या बाहेर असणा-या इतरांना, विक्री करेल.

परंतु आणखी असे की, विजेच्या राज्यांतर्गत व्यापारासाठी आयोग ठरवून देईल त्या व्यापारी फायद्यात विजेचा व्यापार करावा लागेल.

परंतु असेही की, अधिनियमाच्या कलम ६२ खाली, ठरविलेले आकार आणि विजेचे दर यापासून अपेक्षित महसुलाची गणना करताना, विजेच्या व्यापारापासून प्राप्त झालेला महसूल हा, वितरण परवानाधारकाचा महसूल म्हणून मानण्यात येईल.

८.३.८ परवानाप्राप्त व्यवसायाच्या प्रयोजनाकरिता दिलेल्या कर्ज किंवा हमी खेरीज, कोणतेही कर्ज देण्यापूर्वी किंवा कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही दायित्वासाठी कोणतीही हमी देण्यापूर्वी, वितरण परवानाधारक आयोगाची पूर्व-मान्यता घेईल.

परंतु असे की, कर्मचा-यांना त्यांच्या सेवा-शर्तीप्रमाणे द्यावयाच्या कर्जांना आणि व्यवसायात नित्याच्या दिल्या जाणा-या व्यापारी अग्रिमांना, पूर्व-मान्यता घेण्याची अट लागू असणार नाही.

८.३.९ परवानाप्राप्त व्यवसायाशी निगडित सामग्री किंवा सेवांचा पुरवठा परवानाधारकाला करण्यासाठी, वितरण परवानाधारक, आयोगास लेखी कळवून, त्याच्याशी संलग्न असलेल्या कोणत्याही कंपनीची, खालील अटींच्या अधीन राहून, नेमणूक करेल:-

(अ) हा व्यवहार, जवळीक बाजूला ठेवून आणि प्राप्त परिस्थितीत योग्य व रास्त किंमतीस करण्यात येईल, म्हणजे या विनियमाच्या प्रयोजनार्थ असे की, वितरण परवानाधारक आणि वितरण परवानाधारकाशी संबंधित आणि नात्याने जोडली नसलेली इतर व्यक्ती यांच्यात ज्या अटींवर व्यवहार करण्यात येईल, वस्तुतः त्याच अटींवर कोणताही विशिष्ट व्यवहार करण्यात येईल;

(ब) हा व्यवहार, सामग्री व सेवा पुरविण्या संबंधी लागू असलेल्या कायद्याशी, तो परवानाप्राप्त व्यवसायाला जसा लागू असेल त्याप्रमाणे, सुसंगत असेल; आणि

(क) वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाच्या विनियमात विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार, एकूण महसूलाची गरज आणि वीज दर व आकार यापासून मिळणा-या अपेक्षित महसूलाची परिगणना करण्यासाठी, आयोगाकडे करावयाच्या अर्जाचा एक भाग म्हणून, परवानाधारक अशा व्यवस्थेचा संपूर्ण तपशील, आयोगाला देईल.

(ड) वरील खंड (अ) मधील आवश्यक बाबींची पूर्तता केल्याबाबतचे सनदी लेखपालाचे प्रमाणपत्र, वितरण परवानाधारक प्रत्येक आर्थिक वर्षासाठी, आयोगाला सादर करेल;

स्पष्टीकरणः या विनियमाच्या प्रयोजनार्थ, एखादी कंपनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या, नियंत्रण करते, नियंत्रित होते किंवा परवानेधारकाच्या सामायिक नियंत्रणाखाली येते, ती कंपनी 'संलग्न' कंपनी होय; येथे 'नियंत्रण ' म्हणजे पन्नास टक्केपेक्षा (५०) अधिक सम-भाग भांडवलावर मालकी हक्क असणे, किंवा मतदान अधिकार असणे किंवा संचालक मंडळातील बहुसंख्य संचालक नेमण्याचे अधिकार असणे.

परंतु असे की, वरील संबंधात, आयोग जी माहिती पाठविण्याचे निदेश देईल ती माहिती वितरण परवानाधारक आयोगास पाठवेल.

८.३.१०वितरण परवानाधारक, त्याचा परवाना इतर कोणात्याही व्यक्तीला, आयोगाच्या पूर्व-मान्यतेशिवाय, हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करणार नाही.

८.३.११ जेथे वितरण परवानाधारकाने त्याच्या वितरणाच्या क्षेत्रातील विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रात विजेचे वितरण आणि/किंवा पुरवठा करण्यासाठी फ्रॅन्चायसीजची नियुक्ती केली असेल तेथे अशा नियुक्त केलेल्या फ्रॅन्चायसीजचा पूर्ण तपशील सादर करण्यास अशा वितरण परवानाधारकास आयोग कळवू शकेल.

८.३.१२ आयोगाची पूर्व-मान्यता घेतल्याशिवाय वितरण परवानाधारक-

(अ) कोणत्याही इतर परवानेधारकाचा उपक्रम, खरेदी करुन, ताब्यात घेऊन किंवा अन्य प्रकारे, संपादन करुन घेण्यासाठी कोणताही व्यवहार करणार नाही; आणि

(ब) विनियम ८.३.७ (ब) मध्ये केलेल्या तरतुदीखेरीज, वितरणाच्या क्षेत्राबाहेरील कोणत्याही व्यक्तीला विजेचा पुरवठा करणार नाही.

८.३.१३ परवानाप्राप्त व्यववसायाच्या मत्तांचा जास्तीत जास्त योग्य वापर व्हावा म्हणून जर वितरण परवानाधारकास कोणताही अन्य व्यवसाय करावयाचा असेल तर तो अशा अन्य व्यवसायासंबंधी आयोगास खालील तपशील देऊन लेखी पूर्व-सूचना देईल -

(अ) अन्य व्यवसायाचे स्वरुप;

(ब) अन्य व्यवसायातील प्रस्तावित भांडवली गुंतवणूक;

(क) परवानाप्राप्त व्यवसायाच्या मत्ता व सुविधांच्या अशा अन्य व्यवसायाकरिता होणा-या वापराचे स्वरुप व मर्यादा;

(ड) अन्य व्यवसायांकरिता मत्ता व सुविधांच्या होणा-या वापरामुळे परवानाधारकाच्या परवानाप्राप्त व्यवसायावर आणि परवानाप्राप्त व्यवसायाची कर्तव्ये आणि दायित्वे यथोचितपणे पार पाडण्याच्या क्षमतेवर होणारा परिणाम; आणि

(इ) परवानाप्राप्त व्यवसायाच्या मत्ता व सुविधांचा वापर कोणत्या पध्दतीने करण्यात येईल आणि परवानाप्राप्त व्यवसायाचे कामकाज सुरळीतपणे चालण्यावर कोणताही विपरीत परिणाम न होऊ देता त्यांचा जास्तीत जास्त योग्य पध्दतीने वापर करण्यात येईल याबाबत समर्थन.

८.३.१४ वितरण परवानाधारकाने जर कोणताही अन्य व्यवसाय करण्याचे ठरविले तर, ते खालील अटींच्या अधीन राहून असेल :-

(अ) वितरण परवानाधारक परवानाप्राप्त व्यवसायाच्या मत्ता व सुविधांचा वापर कोणत्याही अन्य व्यवसायाकरिता कोणत्याही प्रकारे करणार नाही किंवा अन्यथा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणत्याही अन्य व्यवसायाचे कामकाज अशा रितीने पचालू देणार नाही की ज्यामुळे परवानाप्राप्त व्यवसायातून अन्य व्यवसायाला कोणत्याही प्रकारे अर्थसहाय्य मिळेल;

(ब) वितरण परवानाधारक, परवानाप्राप्त व्यवसायाच्या मत्ता व सुविधांवर परवानाप्राप्त व्यवसायाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यवसायाकरिता किंवा परवानाप्राप्त व्यवसायाच्या कार्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही कार्यासाठी, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षारित्या, बोजा चढू देणार नाही आणि जेथे वितरण परवानाधारक, परवानाप्राप्त व्यवसायाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यवसाय किंवा कार्याकरिता परवानाप्राप्त व्यवसायाच्या मत्ता आणि सुविधांचा वापर करु इच्छित असेल तर त्याला याबाबत आयोगास पूर्व-सूचना द्यावी लागेल आणि त्यानंतर (एक) मत्ता व सुविधांच्या वापराचा परवानाप्राप्त व्यवसायावरील परिणामांचे मूल्यामापन करण्याचा, (दोन) प्राप्त झालेल्या किंवा प्राप्त होणा-या किंवा प्राप्त होण्याची

शक्यता असलेल्या उत्पन्नाचा अंदाज घेण्याचा आणि खालील खंड (क) मध्ये केलेल्या तरतूदीनुसार वीज वितरण आणि पुरवठ्याचे आकार कमी करण्यासाठी निदेश देण्याचे किंवा आदेश पारित करण्याचे, अधिकार आयोगास राहतील ;

(क) अशा अन्य व्यवसायाकडून प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा, आयोग विनिर्दिष्ट करेल तेवढा हिस्सा, विजेच्या वितरण आणि पुरवठ्यावरील आकार कमी करण्यासाठी वापरण्यात येईल;

(ड) एखाद्या स्वतंत्र कंपनीस आपले कामकाज चालविण्यासाठी तयार करावे व ठेवावे लागतील तशीच लेखा अभिलेखे वितरण परवानाधारक त्याच्या अन्य व्यवसायाच्या कामकाजासंबंधी, स्वतंत्रपणे तयार करेल व ठेवेल की ज्यामुळे अन्य व्यवसायाच्या महसूल, खर्च, मत्ता, दायित्वे, राखीव निधी आणि त्याच्या तरतूदी किंवा अशा अन्य व्यवसायाच्या कार्या-खाती वाजवीरित्या खर्ची टाकता येतील अशा रकमा, परवानाप्राप्त व्यवसायाच्या रकमांपासून, स्वतंत्रपणे ओळखता येतील;

(इ) परवानाप्राप्त व्यवसाय अशा कोणत्याही अन्य व्यवसायाला अर्थ-सहाय्य करणार नाही किंवा अशा अन्य व्यवसायाला सहाय्यभूत होईल अशा रितीने त्याच्या वितरण मत्तांवर बोजा निर्माण करणार नाही; आणि

(फ) वितरण परवानाधारक आयोगाच्या पूर्व-मान्यतेखेरीज, वितरण यंत्रणेत वापरलेल्या कोणत्याही मत्ता, अन्य व्यवसायाच्या कार्यांकरिता हस्तांतरित करणार नाही .

## ८.४ लेखा

८.४.१ आयोगाने अन्यथा परवानगी दिली नसेल तर, या सर्वसाधारण अटी व परवानाप्राप्त व्यवसायाशी निगडीत बाबींच्या प्रयोजनाकरिता, वितरण परवानाधारकाचे आर्थिक वर्ष हे एक एप्रिल पासून पुढील वर्षाच्या एकतीस मार्चपर्यंत राहील.

८.४.२ परवानाप्राप्त व्यवसायाच्या संबंधात आणि तो करीत असलेल्या कोणत्याही अन्य व्यवसायाच्या संबंधात, वितरण परवानाधारक-

(अ) अशा प्रत्येक व्यवसायाकरिता आवश्यक असेलेले लेखा अभिलेखे, अशा रितीने ठेवेल की ज्यामुळे परवानाप्राप्त व्यवसायाचा महसूल, खर्च, मत्ता, दायित्वे, राखीव निधी आणि तरतूदींच्या रकमा किंवा त्याखाली वाजवी रित्या खर्ची टाकता येतील अशा रकमा, वितरण परवानाधारकाच्या पुस्तकात, वितरण परवानाधारक करीत असलेल्या अन्य व्यवसायापासून, वेगळ्या ओळखता येण्याजोग्या असतील.

(ब) अशा लेखा अभिलेख्यांपासून, नियतकालिक लेखा विवरणपत्रे सातत्याने तयार करेल व त्यास पुष्टी देणा-या लेखापरीक्षकाच्या प्रमाणपत्रासह आयोगास पाठवेल. या प्रमाणपत्रात, आयोगाने वेगळे निदेश दिले नसल्यास, कोणत्याही महसूल, खर्च, मत्ता, दायित्वे, राखीव निधी किंवा तरतूद केलेली रक्कम, वेगळी दाखविण्यात येईल, जी परवानाप्राप्त व्यवसायाकडून कोणत्याही अन्य

व्यवसायाच्या किंवा कोणत्याही अन्य व्यवसायाकडून परवानाप्राप्त व्यवसायाच्या खाती, जसे असेल तसे, खर्ची टाकण्यात आली आहे व ज्या आधारे खर्ची टाकण्यात आली आहे त्याचा तपशील दाखविण्यात येईल; किंवा जी वितरण परवानाधारकाचा परवानाप्राप्त व्यवसाय आणि कोणताही अन्य व्यवसाय यामध्ये विभाजनाने किंवा वाटप करुन निश्चित करण्यात आली आहे, असे विभाजन किंवा वाटप ज्या आधारे करण्यात आले त्याचा तपशील, दाखविण्यात येईल;

८.४.३ एखाद्या आर्थिक वर्षाची लेखा विवरणपत्रे तयार करताना, मागील आर्थिक वर्षात ज्या तत्त्वांच्या आधारे महसूल किंवा खर्चाची खाती, विभागणी, किंवा वाटप केले होते, त्यात आयोगाला पूर्व-सूचित केल्याशिवाय वितरण परवानाधारक बदल करणार नाही. महसूल किंवा खर्चाची खाती किंवा विभागणीच्या तत्त्वांमध्ये जर कोणताही बदल प्रस्तावित करण्यात आला तर तो, कंपनी अधिनियम १९५६ व त्या खालील नियम व विनियम यामधील तरतूदी, लेखा मानके किंवा नियम आणि या संबंधांत आयोगाने निर्गमीत केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक सूचनांशी सुसंगत असेल.

८.४.४ जेथे, वितरण परवानाधारकाने, एखाद्या आर्थिक वर्षाची विवरणपत्रे तयार करताना, लगतच्या मागील आर्थिक वर्षातील खाती, विभागणी किंवा वाटपाकरिता स्वीकारलेल्या तत्त्वांमध्ये बदल केला असेल तेथे, आयोगाने निदेश दिल्यास, वितरण परवानाधारक, (त्याने स्वीकारलेल्या तत्त्वानुसार तयार केलेल्या लेखा विवरणपत्रांच्या व्यतिरिक्त), लगतच्या मागील आर्थिक वर्षातील लेख्यांशी तुलना करण्यासाठी, आयोग निदेश देईल त्यानुसार, अतिरिक्त लेखा विवरणपत्रे तयार करुन आयोगास पाठवेल.

८.४.५ आयोगाने अन्यथा मान्यता किंवा निदेश दिले नसल्यास, लेखा विवरणपत्रे आणि लेखा परीक्षकाचा अहवाल -

(अ) या सर्वसाधारण अटी किंवा विशिष्ट अटींमध्ये तरतूद केलेल्या पध्दतीने तयार करण्यात येतील व वितरण परवानाधारकाच्या वार्षिक लेख्यांबरोबर प्रसिध्द करण्यात येतील;

परंतु असे की, कोणत्याही व्यक्तीने लेखा विवरणपत्रे आणि लेखापरीक्षकाचा अहवाल यांची मागणी केल्यास त्यांची प्रत, फोटोकॉपी काढण्यासाठी येणा-या खर्चा इतक्या किंमतीस, देण्यात येईल;

(ब) स्वीकारण्यात आलेली लेखा धोरणे नमूद करतील;

(क) सर्वसाधारणपणे स्वीकारण्यात आलेल्या भारतीय लेखा मानकांनुसार तयार करण्यात येतील; आणि

(ड) आयोग वेळोवेळी ठरवून देईल त्या नमुन्यात तयार करण्यात येतील.

## ८.५ अवाजवी पसंती देण्यास मनाई

८.५.१ वितरण परवानाधारक पुरवठ्याच्या क्षेत्रात विजेचे वितरण किंवा पुरवठा करताना किंवा सेवा पुरविताना कोणत्याही व्यक्तीला अवाजवी पसंती देणार नाही.

८.५.२ आयोगाच्या कोणत्याही आदेशामुळे किंवा अधिनियमाच्या कलम ६५ खाली सबसिडी देण्याबाबतच्या राज्य शासनाच्या आदेशाच्या अंमलबजावणीमुळे जर ग्राहकांमध्ये कोणताही भेदभाव झाला तर त्यामुळे वितरण परवानाधारकाने अशी अवाजवी पसंती दिली आहे, असे मानले जाणार नाही.

## ८.६ आयोगास माहिती देण्याबाबत

८.६.१ आयोगास वेळोवेळी आपल्या स्वतःच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असल्यास, किंवा भारत सरकार, राज्य सरकार, केंद्रीय विद्युत नियामक आयोग, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, केंद्र व राज्य पारेषण कंपन्या आणि राष्ट्रीय, प्रादेशिक किंवा राज्य भार प्रेषण केंद्रे यांना देण्यासाठी लागेल अशी वितरण परवानाधारकाच्या परवानाप्राप्त व्यवसाय किंवा अन्य कोणत्याही व्यवसायासंबंधीची माहिती, कागदपत्रे व तपशील, वितरण परवानाधारक आयोगाला त्वरित देईल.

८.६.२ आयोग निदेश देईल अशी माहिती ठेवणे हे वितरण परवानाधारकाचे कर्तव्य असेल व या माहितीमध्ये इतर बाबींबरोबरच, परवानाधारकाने त्याच्या पुस्तकात ठेवावयाची किमान माहिती, ही माहिती कशा रितीने ठेवण्यात येईल, व या संबंधात परवानेधारकाने करावयाची तपासणी आणि त्या अनुषंगाने इतर सर्व तपशीलाचा समावेश असेल.

८.६.३ आयोग वेळोवेळी निदेश देईल त्यानुसार, वितरण परवानाधारक, त्याच्या कामगिरीच्या प्रगतीबाबतची नियतकालिक माहिती आयोगास देईल.

८.६.४ वितरण यंत्रणेच्या कोणत्याही भागावर परिणाम करणा-या कोणत्याही महत्वाच्या घटनेबाबतची माहिती, वितरण परवानाधारक, आयोगास त्वरित लेखी कळवेल आणि-

(अ) अशी घटना घडल्यापासून लवकरात लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत ४८ तासांच्या आत, अशा घटनेबाबत पोलिसांना अहवाल देईल आणि आयोगाला कळवेल;

(ब) अशी घटना घडल्यापासून एक महिन्याच्या आत, त्या घटनेबाबत व त्यामागील कारणांबाबतच्या, वितरण परवानाधारकाला माहित असलेल्या वस्तुस्थितीचा, संपूर्ण तपशीलवार अहवाल, आयोगास सादर करेल;

(क) जर वरील उप-खंड (ब) मधील अहवाल पाठविण्यास, घटना घडल्याच्या दिनांकापासून एक महिन्याहून अधिक कालावधी लागण्याची शक्यता असेल तर, वितरण परवानाधारक घटना घडल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, घटनेच्या व त्यामागील कारणांच्या, त्याला सहजपणे देता येईल त्या तपशीलांसह एक प्राथमिक अहवाल आयोगास सादर करेल व अशा घटनेचा पूर्ण अहवाल

देण्यासाठी वितरण परवानाधरकाला एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी का लागणार आहे, याबाबतची कारणे त्यात नमूद करेल; आणि

(ड) आयोग निदेश देईल त्याप्रमाणे अहवालाच्या प्रती राज्य शासन, केंद्र व राज्य पारेषण कंपन्या, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, आणि अन्य व्यक्तींना देईल.

८.६.५ कोणती घटना महत्वाचा बिघाड म्हणून मानण्यात यावी, याबाबत आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

८.६.६ आयोग स्वेच्छाधिकाराने, एखाद्या महत्वाच्या घटनेबाबत, स्वतंत्र व्यक्तीचा अहवाल सादर करण्यास, सांगू शकेल.

परंतु असे की, असा अहवाल तयार करण्याचा खर्च वितरण परवानाधारकाला करावा लागेल.

८.६.७ कोणताही महत्वाचा बिघाड टाळण्यासाठी वितरण यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि वितरण व्यवसायाच्या संबंधित कोणत्याही इतर बाबतीत, जनहिताच्या दृष्टिकोनातून, आयोगास आवश्यक वाटेल असा अभ्यास करुन घेण्यास, आयोग, वितरण परवानाधारकास, वेळोवेळी निदेश देऊ शकेल.

८.६.८ दिलेल्या वितरण परवान्यातील बंधनांचे पालन करण्यास प्रतिबंध करणा-या कोणत्याही घटनेची, तसेच इतरांनी केलेल्या किंवा न केलेल्या कृतींबाबतची माहिती आणि अशा घटनेचा परिणाम सौम्य करण्यासाठी त्याने केलेल्या उपाय-योजनांची माहिती, वितरण परवानाधारक वेळीच आयोगास कळवेल.

८.६.९ आयोग विनिर्दिष्टपणे निदेशित करेल अशा घटनांबाबत, वर नमूद केल्याप्रमाणे अशा घटना जरी अन्यथा महत्वाच्या बिघाड या सदराखालील नसतील तरी, विनियम ८.६.४ ते ८.६..८ मधील तरतुदींचे पालन करण्यास आयोग वितरण परवानाधारकाला, कोणत्याही वेळी सांगू शकेल आणि, त्यांचे पालन करणे वितरण परवानाधारकावर बंधनकारक राहील.

परंतु असे की, आयोग ज्या दिवशी वितरण परवानाधारकाला अशा आवश्यकतेबाबत लेखी कळवेल त्या दिनांकापासून विनियम ८.६.४ मध्ये विहीत केलेल्या काल-मर्यादेची सुरुवात होईल

८.६.१० आयोगाने अधिसूचित केलेल्या अन्य विनियमांच्या अधीन राहून, वितरण परवाना अंमलात आल्यापासून तीन महिन्याच्या आत आयोग निदेशित करेल अशा कालावधीकरिता, वितरण परवानाधारक एक व्यवसाय-आराखडा सादर करेल आणि दर-वर्षी हा आराखडा अद्ययावत करेल. व्यवसाय आराखड्यात इतर गोष्टींबरोबरच, (१) वर्षनिहाय मागणीत होणारी वाढ, (२) वर्षनिहाय वितरण हानी कमी करावयाचा प्रस्ताव त्याबाबतच्या विशिष्ट कृती आराखड्यासह, (३) आंतर-जोडणी बिंदूंशी मीटर्स

बसविण्याचा आराखडा, (४) मागील तोट्यांचा परामर्ष, (५) खर्च कपातीची योजना, आणि (६) इतर महत्वाचे वित्तीय विश्लेषण किंवा मापदंड, याबाबतची माहिती असेल.

परंतु असे की, अस्तित्वात असलेले परवानेधारक, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून तीन (३) महिन्यांच्या आत, असा व्यवसाय-आराखडा सादर करतील.

८.६.११ वितरण परवानाधारक, प्रत्येक आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या अखेरीस, त्याच्या व्यवसाय आराखड्याच्या मागील आर्थिक वर्षाच्या अंमलबजावणीत झालेल्या प्रगतीचा पूर्ण तपशील, आयोगाने मंजूर केलेल्या आराखड्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील प्रगतीच्या तुलनेसह, आयोगास सादर करेल.

## ८.७ भांडवली गुंतवणूक

८.७.१ एक कार्यक्षम, सुरक्षित, समन्वित व काटकसरीची वितरण यंत्रणा उभारणे, सुव्यवस्थित राखणे व चालविणे आणि पुरवठ्याच्या क्षेत्रांतील प्रत्येक ग्राहकाला सेवा पुरविणे, या सार्वत्रिक सेवा बंधनाची पूर्तता करण्यासाठी, वितरण परवानाधारक दूरदर्शीपणाने व आवश्यक तेवढ्या गुंतवणूकीखेरीज अन्य कोणतीही गुंतवणूक करणार नाही.

८.७.२ वितरण व्यवसायात भांडवली गुंतवणूक करण्यापूर्वी, वितरण परवानाधारक, आयोग जे विनियम, मार्गदर्शक सूचना, निदेश, आणि आदेश वेळावेळी काढेल त्यांचे यथोचित पालन, करेल.

८.७.३ वितरण परवानाधारकास, संबंधित कालावधीत करावयाच्या भांडवली गुंतवणूक योजनांचा तपशील देणारा दीर्घ-कालीन आणि अल्प-कालीन गुंतवणूक आराखडा(डे), आयोगाकडे पूर्व-मान्यतेसाठी सादर करण्यास, त्यासाठी निदेश काढून, आयोग सांगू शकेल.

८.७.४ भांडवली गुंतवणूक असणा-या योजनांना आयोगाची पूर्व-मान्यता घेण्यासाठी आयोग वेळोवेळी निदेशित करेल त्या कार्यपध्दतीनुसार, वितरण परवानाधारक, आयोगाकडे अर्ज करेल.

## ८.८ मत्तांचे हस्तांतरण

८.८.१ या विनियमामधील तरतूदींखेरीज, एका व्यवहारात किंवा संबंधित अनेक व्यवहारात, ज्या मत्तेची पुस्तकी किंमत प्रस्तावित हस्तांतरणाच्या वेळी, आयोगाने निदेशान्वये किंवा साधारण किंवा विशेष आदेशान्वये ठरविलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, वितरण परवानाधारक मत्तेचे हस्तांतरण करणार नाही किंवा मत्तेवरील संचालनविषयक नियंत्रण सोडणार नाही.

८.८.२ आयोगाने वरीलप्रमाणे ठरविलेल्या रकमेपेक्षा अधिक किंमत असलेली कोणतीही मत्ता हस्तांतरित करण्याचा किंवा तिच्यावरील संचालनविषयक नियंत्रण सोडण्याचा वितरण परवानाधारकाचा इरादा असेल तर, त्याबाबत वितरण परवानाधारक लेखी पूर्व-सूचना

आयोगास देईल आणि अशा मत्तेचा संपूर्ण तपशील, त्यांची विल्हेवाट लावण्यामागची कारणे आणि इतर संबंधित वस्तुस्थिती वितरण परवानाधारक आयोगास कळवेल.

परंतु असे की, सूचना प्राप्त झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत, या व्यवहारास पुष्टी देणारी अधिक माहिती आयोग मागवेल आणि साधारणपणे अशी अधिक माहिती वितरण परवानाधारकाने सादर केल्यानंतर तीस (३०) दिवसांच्या आत, आणि जर वरीलप्रमाणे अधिक माहिती मागण्यात आलेली नसेल, तर अर्ज सादर केल्यापासून साठ (६०) दिवसांच्या आत, आयोग त्यास उचित वाटतील अशा अटी व शर्तींवर किंवा फेरबदलांसह, हस्तांतरण व्यवस्थेस मान्यता देईल किंवा लेखी कारणे नमूद करुन नामंजूर करेल.

८.८.३ वितरण परवानाधारक, वर उल्लेखलेली कोणतीही मत्ता हस्तांतरित करेल किंवा तिच्यावरील संचालनविषयक नियंत्रण सोडेल, जेथे:

(अ) आयोग घालेल अशा अटी व मर्यादांच्या अधीन राहून, अशा हस्तांतरणास किंवा संचालनविषयक नियंत्रण सोडण्यास संमती असल्याची लेखी पुष्टी आयोगाने दिली आहे; किंवा

(ब) आयोगाने वरील खंड ८.८.२ मध्ये नमूद केलेल्या कालावधीत, अशा हस्तांतरणास किंवा संचालनविषयक नियंत्रण सोडण्यास कोणतीही हरकत, वितरण परवानाधारकास लेखी कळविली नसेल तर आणि लागू असलेल्या अन्य विनियमांमध्ये आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या पारदर्शक प्रक्रियेस अनुसरुन हस्तांतरण केले असेल.

परंतु असे की, वीज दर निश्चित करण्याच्या अटी व शर्ती विनिर्दिष्ट करणा-या आयोगाच्या विनियमांनुसार, एकूण महसूली गरजेची आणि वीज दर आणि आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाची परिगणना करण्यासाठी, आयोगाकडे करावयाच्या अर्जाचा एक भाग म्हणून, वितरण परवानाधारक, अशा व्यवहारांचा पूर्ण तपशील, आयोगास देईल.

८.८.४ वितरण परवानाधारक कोणतीही मत्ता हस्तांतरित करेल किंवा तिच्यावरील संचालनविषयक नियंत्रण देखील सोडेल जेथे:

(अ) आयोगाने या विनियमाच्या प्रयोजनार्थ पुढील बाबींना सर्वसाधारण संमती देणारे निदेश निर्गमित केले असतील:

(एक) विनिर्दिष्ट प्रकारचे व्यवहार, आणि/ किंवा

(दोन) विनिर्दिष्ट प्रकारच्या मत्तेचे हस्तांतर करणे किंवा तिच्यावरील संचालनविषयक नियंत्रण सोडणे, आणि/किंवा

(तीन) ज्या अटींवर संमती देण्यात आली आहे अशा कोणत्यही अटींना अनुसरून प्रस्तुत मत्तेचे हस्तांतरण किंवा तिच्यावरील संचालनविषयक नियंत्रण सोडणे, किंवा

(ब) सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये आवश्यक किंवा अनिवार्य असल्यास प्रस्तुत हस्तांतरण किंवा संचालनविषयक नियंत्रण सोडणे, किंवा

(क) वितरण परवानाधारकाने केवळ कोणत्याही अन्य व्यवसायाकरिता प्रस्तुत मत्ता संपादन केली आणि वापरली असेल आणि त्यामुळे जमिनीवर कोणताही कायदेशीर किंवा लाभदायी हक्क निर्माण झालेला नसेल किंवा अन्यथा वितरण यंत्रणेचा भाग होत नसेल किंवा ती मत्ता अन्यथा परवानाप्राप्त व्यवसायाशी संबधित किंवा त्याकरिता आवश्यक नसेल.

८.८.५ पुढील अटींच्या अधीन राहून, गुंतवणूकीकरिता निधी उभा करण्यासाठी, मत्तांचा उपयोग करण्याचा हक्क वितरण परवानाधारकास असेल:

(अ) अशा व्यवस्थेबाबत, संबंधित करार अंमलात येण्याच्या दिनांकाच्या कमीत कमी कामाच्या पंधरा (१५) दिवस अगोदर वितरण परवानाधारक आयोगास कळवेल;

(ब) निधी उभारण्याची व्यवस्था सात (७) वर्षे किंवा आयोग विनिर्दिष्टपणे निदेश देईल त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी नसेल;

(क) वितरण परवानाधारक अशा मत्तांचा वापर दूरदर्शीपणाने आणि योग्य पध्दतीने करेल; आणि

(ड) वितरण परवानाधारक वितरण यंत्रणेतील मत्तांवर त्याचे संचालनविषयक नियंत्रण राहू देईल.

## ८.९ परवाना शुल्काचे प्रदान

८.९.१ परवाना अंमलात असेल त्या कालावधीत, प्रत्येक वर्षी १० एप्रिल पर्यंत किंवा आयोग परवानगी देईल त्या वाढीव कालावधीत, आयोग विनिर्दिष्ट करेल त्याप्रमाणे आणि आयोग निदेशित किंवा विनिर्दिष्ट करेल त्या पध्दतीनुसार, वितरण परवानाधारक परवाना शुल्क आयोगाला प्रदान करेल.

८.९.२ वितरण परवानाधारकाने, त्याच्या परवान्यानुसार देय असलेले शुल्क किंवा अन्य आकार, परवान्यानुसार निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत किंवा आयोगाने परवानगी दिलेल्या वाढीव कालावधीत आयोगाला प्रदान केले नाही तर-

(अ) इतर कर्तव्यांना बाधा न आणता, बाकी रकमेवर थकित कालावधीकरिता, आयोग वेळोवेळी निदेश देईल त्या दराने व्याज देईल आणि असे निदेश दिलेले नसल्यास, दर महा दर शेकडा १.५ दराने सरळ व्याज अदा करण्यास वितरण परवानाधारक जबाबदार राहील; आणि

(ब) अधिनियमातील तरतूदींनुसार आयोग वितरण परवाना रद्द करु शकेल.

८.९.३ विलंबित प्रदानासाठी भरलेले व्याज वगळून, या विनियम ८.९ खाली अदा केलेल्या कोणत्याही शुल्काचा, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी एकूण महसूलाच्या गरजेत खर्च म्हणून समाविष्ट करण्याचा हक्क वितरण परवानाधारकास राहील.

## ८.१० वितरण परवाना रद्द करणे

८.१०.१ विद्युत अधिनियमाच्या कलम १९ मधील तरतुदींच्या अधीन राहून, जर आयोगाच्या मते जनहिताच्या दृष्टीकोनातून आवश्यक वाटल्यास, आयोग, त्यास उचित वाटतील अशा अटी व शर्तींवर, वितरण परवानाधारकाचा परवाना, त्याच्या वितरणाच्या संपूर्ण क्षेत्रासाठी किंवा कोणत्याही भागाकरिता, त्यासंबंधीची कारणे लेखी नमूद करुन, रद्द करु शकेल.

८.१०.२ आयोग, वितरण परवाना रद्द करण्यापूर्वी, त्याच्या मते आवश्यक वाटल्यास, ही बाब राज्य शासनास संदर्भ करेल आणि वितरण परवानाधारकाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी करावयाच्या व्यवस्थेबाबत निर्णय घेईल.

८.१०.३ कामकाज प्रचालनाची कार्यपध्दती निश्चित करणारे आयोगाचे विनियम परवाना रद्द करण्याबाबतच्या अशा कार्यपध्दतीचे नियमन करतील.

## ८.११ परवान्याच्या अटींमध्ये दुरुस्ती

आयोगाच्या मते, जन-हिताच्या दृष्टिकोनातून आवश्यक वाटल्यास, परवानेधारकाच्या अर्जाच्या आधारे किंवा अन्यथा, अधिनियमाच्या कलम १८ अनुसार, वितरण परवान्याच्या या सर्वसाधारण अटीं आणि विशिष्ट अटींमध्ये, योग्य वाटतील असे बदल किंवा दुरुस्ती, आयोगास करता येईल.

## ८.१२ वादाचे निराकरण

विद्युत अधिनियमाच्या कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (एफ) सह कलम १५८ अंमलात आणत असताना 'वितरण परवानाधारक अणि कोणताही इतर परवानाधारक किंवा वितरण परवानाधारक आणि विद्युत निर्मिती कंपनी यांच्यामधील वादावर अभिनिर्णय

करण्याचा किंवा वादावर अभिनिर्णय करण्यासाठी व समझोता करण्यासाठी लवाद म्हणून व्यक्तींला/व्यक्तींना, स्वेच्छा निर्णयाने नामनिर्देशीत करण्याचा अधिकार आयोगास राहील.

## ८.१३ राज्य ग्रिड संहितेचे पालन

८.१३.१ राज्य ग्रिड संहितेमधील, वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेच्या संचालनास किंवा अन्यथा त्याच्या कोणत्याही कामकाजास लागू असतील त्या तरतुदींचे पालन वितरण परवानाधारक करेल.

८.१३.२ राज्यातील बाधित झालेल्या कोणत्याही विद्युत निर्मिती कंपन्या, पारेषण परवानेधारक, वितरण परवानेधारक, राज्य पारेषण कंपनी, राज्य भार प्रेषण केंद्र आणि विद्युत व्यापारी यांच्याशी सल्लामसलत करुन, आयोग निदेशित करेल अशा राज्य ग्रिड संहितेमधील भागांच्या संबंधात आणि त्या मर्यादेपर्यंत, विनियम ८.१३.१ खाली असलेल्या बंधनातून, वितरण परवानाधारकास मुक्त करण्याबाबतचे निदेश आयोग देऊ शकेल.

## ८.१४ विद्युत पुरवठा संहिता आणि इतर संहिता

८.१४.१ वितरण परवानाधारक, वेळोवेळी अंमलात असलेल्या आयोगाच्या विनियमांचे आणि आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या विद्युत पुरवठा संहितेचे पालन करेल.

८.१४.२ परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमधील आयोग निदेशित करेल अशा भागांच्या संबंधात आणि त्या मर्यादेपर्यंत, विद्युत पुरवठा संहितेखाली असलेल्या बंधनातून, परवानाधारकाला मुक्त करण्याबाबतचे निदेश, परवानाधारकाच्या विनंतीवरुन, आयोग देऊ शकेल.

८.१४.३ वितरण परवानाधारकाच्या वितरणाच्या क्षेत्रातील, विद्युत पुरवठा संहितेशिवाय, विद्युत पुरवठ्यासाठी लागू असलेल्या इतर अटींना, आयोग वितरण परवानाधारकाच्या विनंतीवरुन, वेळोवेळी मंजूरी देऊ शकेल.

८.१४.४ वितरण परवानाधारक, विनंती अर्ज करणा-या कोणत्याही व्यक्तीला, प्रचलित विद्युत पुरवठा संहितेच्या प्रती, फोटो-प्रत काढण्यासाठी येणा-या खर्चाइतक्या किंमतीस, उपलब्ध करुन देईल.

८.१४.५ परवानाधारक त्याच्या परवानाप्राप्त व्यवसायाचे प्रचालन उचित कंपनी प्रथा आणि आयोग निदेश देईल त्याप्रमाणे खालील बाबतीत करेल-

(एक)वितरण यंत्रणेचा विकास, देखभाल आणि संचालन, हे कार्यक्षम, सुरक्षित, समन्वित आणि काटकसरीने करता यावे म्हणून वितरण यंत्रणेच्या संचालन आणि वापराशी जितक्या संबधित असेल तितक्या वितरण यंत्रणेशी जोडलेल्या विद्युत वाहिन्या आणि

विद्युत संयंत्र आणि उपकरणे यासह वितरण यंत्रणेच्या संचालन व वापर आणि विद्युत जोडणी, या संबंधातील सर्व महत्वाच्या तांत्रिक बाजू;

(दोन) परवानाधारकाने त्याच्या वितरण यंत्रणेच्या नियोजन आणि विकासात लागू करावयाचे तांत्रिक आणि डिझाईन निकष व कार्यपध्दती;

(तीन)परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेशी जोडलेल्या किंवा जोडणीची मागणी करणा-या कोणत्याही व्यक्तीने जोडणीसाठी पूर्तता करावयाच्या तांत्रिक, डिझाइन आणि संचालन विषयक निकष विनिर्दिष्ट करण्या-या अटी;

(चार) संचालनाच्या साधारण आणि असाधारण परिस्थितीत परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचे सुरक्षित संचालन आणि दर्जेदार आणि खात्रीच्या वीज पुरवठ्यासाठी आवश्यक असेल तितके, परवानेधारकाच्या वितरण यंत्रणेचे संचालन आणि या यंत्रणेतील परवानेधारकाच्या वितरण यंत्रणेशी संबधित संयंत्र आणि/किंवा वितरण यंत्रणेचे संचालन करणा-या व्यक्ती;

८.१४.६ कोणत्याही उचित कंपनी प्रथांचे किंवा वेळोवेळी आयोगाने दिलेल्या निदेशांची पूर्तता करण्यात परवानाधारकास अपयश आल्यास, परवानाधारकास त्याची बाजू मांडण्याची योग्य संधी दिल्यानंतर, त्याला जो दंड लावण्यात येईल तो भरण्यास परवानाधारक जबाबदार राहील.

## ८.१५ ग्राहकांशी संबधित बाबी

८.१५.१ वितरण परवानाधारक आयोगाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या ग्राहक सेवेसंबंधीच्या विनियमांचे, विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटीं आणि कृतीच्या मानकांमध्ये असलेल्या ग्राहक सेवेसंबंधीच्या अटी व शर्तीसह, वितरण परवानाधारक यथोचित पालन करेल.

८.१५.२ वितरण परवानाधारक, अधिनियमाच्या कलम ४२च्या संदर्भात आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्राहकांच्या गा-हाण्यांच्या निवारणासाठी मंचाची स्थापना करेल.

८.१५.३ वितरण परवानाधारकाकडून सेवा प्राप्त होणा-या ग्राहकांना, त्यांच्या हक्कांची माहिती देणारे ग्राहक हक्क विवरणपत्र, आयोग निदेश देईल त्या मुदतीत, वितरण परवानाधारक, तयार करेल आणि आयोगाकडे पूर्व-मान्यतेसाठी सादर करेल.

परंतु असे की, अशा ग्राहक हक्क विवरणपत्राचा एक नमूना आणि मजकूर, परवानाधारकाने स्वीकारण्यासाठी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाने, आयोग पुरवेल.

८.१५.४ वितरण परवानाधारक-

अ) ग्राहक हक्क विवरणपत्र अस्तित्वात आले असल्याचे आणि त्यात नंतर केलेल्या महत्वाच्या सुधारणांबाबत आणि त्याची पहाणी करण्याची पध्दत किंवा प्रत मिळविण्याची पध्दत, ग्राहकांना कळवेल;

(ब) अशा ग्राहक हक्क विवरणपत्रांच्या प्रती त्याच्या कार्यालयाच्या सर्वसाधारण कार्यालयीन वेळेत पाहणीसाठी जनतेला उपलब्ध करुन देईल; आणि

(क) अशा ग्राहक हक्क विवरणपत्राच्या प्रती, त्याच्या कडून सेवा प्राप्त करुन घेणा-या सर्व नवीन ग्राहकांना आणि इतर कोणत्याही व्यक्तीने मागणी केल्यास फोटोकॉपी काढण्यासाठी येणा-या खर्चा इतक्या किंमतीस, उपलब्ध करुन देईल.

परंतु असे की, ग्राहकांना, आवश्यकतेनुसार ठराविक कालांतराने इंटरनेटसह प्रसिध्दीच्या वेगवेगळ्या माध्यमातून, जास्तीत जास्त माहिती स्वतःहून देण्याचा वितरण परवानाधारक सातत्याने प्रयत्न करेल की जेणेकरुन, माहितीचा व्यापक प्रसार होईल तसेच जनतेला ती ज्या नमुन्यात आणि ज्या पध्दतीने हवी असेल त्याप्रमाणे सहजरित्या उपलब्ध होईल.

स्पष्टीकरण- या अटीच्या प्रयोजनासाठी, "प्रसार करणे" याचा अर्थ सूचना फलक, वर्तमानपत्रे, जाहीर उदघोषणा, प्रसिध्दी माध्यमातून प्रसारणे, इंटरनेट किंवा अन्य कोणत्याही साधनाने माहिती करुन देणे किंवा कळविणे.

ड) वितरण परवानाधारकाकडून स्थापन करण्यात आलेल्या अंतर्गत गा-हाणे निवारण कक्षाने करावयाच्या गा-हाण्यांच्या निवारणाकरिता आयोगाने अधिनियमाच्या कलम ४२ (५) (६) आणि (७) खाली केलेल्या विनियमातील तरतुदींनुसार प्रसिध्द करावयाचे त्याचे नियम व कार्यपध्दत आयोगास सादर करेल.

## ८.१६ संकीर्ण

८.१६.१ या सर्वसाधारण अटी आणि त्यासंबधीच्या अटी व शर्ती यांच्या अर्थनिश्चितीच्या बाबतीत उद्भवणा-या सर्व प्रश्नांवर निर्णय घेण्याची बाब आयोगाच्या अखत्यारीतील राहील आणि अशा प्रकरणी आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

८.१६.२ या सर्वसाधारण अटींशिवाय, विशिष्ट परवानाधारक किंवा परवानाधारकांच्या गटासाठी लागू असणा-या विशिष्ट अटी आयोग विनिर्दिष्ट करेल आणि अशा अटी परवान्याच्या अटी म्हणून मानण्यात येतील.

८.१६.३ या सर्वसाधारण अटी वितरण परवानाधारकांना आणि विद्युत अधिनियमाच्या कलम १४च्या पहिल्या, दुस-या, तिस-या आणि पाचव्या परंतुकाखालील सर्व मानीव वितरण परवानाधारकांना लागू असतील.

## ९. दुरुस्ती करण्याचे अधिकार

आयोगाला कोणत्याही वेळी, या विनियमातील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेर-फार, अल्प-बदल किंवा दुरुस्ती करता येईल. या विनियमात केलेले कोणतेही बदल त्यासंबधीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू राहतील आणि ते बदल त्यानंतर त्यांच्या बदल केलेल्या स्वरुपातच अंमलात राहतील किंवा राहणार नाहीत, जसे असेल तसे. तथापि, हे बदल अंमलात आणत असताना, या पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेला, अशा बदलामुळे किंवा रद्दीकरणामुळे, बाधा येणार नाही.

## १०. अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमातील तरतूदींची अंमलजावणी करताना कोणतीही अडचण आली तर, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत नसतील अशा परंतु अडचण दूर करण्यासाठी आवश्यक असतील अशा तरतूदी, सर्वसाधारण किंवा विशिष्ट आदेशाने, आयोगाला करता येतील.

## ११. अपवाद आणि रद्द करणे

(१) खालील खंड (२) मध्ये नमूद केले आहे त्याखेरीज, आयोगाने दिनांक १० जून, २००४ रोजी अधिसूचित केलेले महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, २००४ , याद्वारे रद्द करण्यात येत आहेत;

(२) वरीलप्रमाणे विनियम रद्द केले असले तरी, या रद्द केलेल्या विनियमांखाली केलेली किंवा केली गेली आहे असे वाटणारी कोणतीही बाब किंवा कार्यवाही, अधिनियम किंवा त्याखाली केलेल्या नियम व विनियमांखालील तरतूदींशी विसंगत नसेल तितकी या विनियमांखाली करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

## १२. विनिर्दिष्ट केलेली मुदत वाढविणे किंवा कमी करणे

अधिनियमातील तरतुदींच्या अधीन राहून, कोणतीही कृती करण्यास या विनियमांनी विनिर्दिष्ट केलेली मुदत (ती यापूर्वीच संपली असेल किंवा नसेल) पुरेशा कारणास्तव आयोगाच्या आदेशाद्वारे, वाढविता येईल किंवा कमी करता येईल.

(श्रीमती मालिनी शंकर)

सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,

मुंबई
दिनांक २७ नोव्हेंबर, २००६

अनुक्रमणिका


| अनुक्रमांक | विनियम | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | | प्रास्ताविक | १ |
| ०२ | ०१ | संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ | २ |
| ०३ | २.१ | व्याख्याः | २ |
| ०४ | २.२ | अर्थनिश्चिती | ४ |
| ०५ | ३ | हे विनियम कोणास लागू असतील | ५ |
| ०६ | ४ | पात्रतेच्या अटी /अपात्रता | ५ |
| ०७ | ५ | परवाना देण्याची कार्यपध्दती | ५ |
| ०८ | ५.१ | परवाना देण्याकरिता करावयाचा अर्ज | ५ |
| ०९ | ५.२ | अर्जाची छाननी | ६ |
| १० | ५.३ | परवाना देण्याकरिता अर्जाची नोटीस | ६ |
| ११ | ५.४ | परवान्याची तपासणी व त्याच्या प्रती पुरवण्याबाबत | ७ |
| १२ | ६ | परवान्याची दुरुस्ती | ८ |
| १३ | ७ | अर्जावरील कार्यवाही | ९ |
| १४ | ८ | वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी | ९ |
| १५ | ८.१ | मुदत | ९ |
| १६ | ८.२ | कायदे, नियम व विनियमांचे पालन | ९ |
| १७ | ८.३ | वितरण परवानाधारकाची कार्ये/कामकाज | ९ |
| १८ | ८.४ | लेखा | १४ |
| १९ | ८.५ | अवाजवी पसंती देण्यास मनाई | १५ |
| २० | ८.६ | आयोगास माहिती देण्याबाबत | १६ |
| २१ | ८.७ | भांडवली गुंतवणूक | १८ |
| २२ | ८.८ | मत्तांचे हस्तांतरण | १८ |
| २३ | ८.९ | परवाना शुल्काचे प्रदान | २० |
| २४ | ८.१० | वितरण परवाना रद्द करणे | २१ |
| २५ | ८.११ | परवान्याच्या अटींमध्ये दुरुस्ती | २१ |
| २६ | ८.१२ | वादाचे निराकरण | २१ |

| | | | |
|---|---|---|---|
| २७ | ८.१३ | राज्य ग्रिड संहितेचे पालन | २१ |
| २८ | ८.१४ | विद्युत पुरवठा संहिता आणि इतर संहिता | २२ |
| २९ | ८.१५ | ग्राहकांशी संबधित बाबी | २३ |
| ३० | ८.१६ | संकीर्ण | २४ |
| ३१ | ९ | दुरुस्ती करण्याचे अधिकार | २४ |
| ३२ | १० | अडचणी दूर करण्याचे अधिकार | २५ |
| ३३ | ११ | अपवाद आणि रद्द करणे | २५ |
| ३४ | १२ | विनिर्दिष्ट केलेली मुदत वाढविणे किंवा कमी करणे | २५ |